Local Disk/S/New

क्र./अका/खनिज/कावि-370 /2020
जिल्हाधिकारी गोंदिया, यांचे कार्यालय
दिनांक:- 24/06/2020

प्रति,

उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
भंडारा

**विषय** :- गोंदिया जिल्हयातील 24 रेतीघाटाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी इतिवृत्ताबाबत.

**संदर्भ** :- आपले कार्यालयीन पत्र क्र.मपनि/उप्राकांभ/e-mail/2020 दिनांक 23/06/2020

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने गोंदिया जिल्हयातील एकुण प्रस्तावीत 24 रेतीघाटाची दिनांक 17/06/2020 रोजी ऑनलाईन झुम ॲप पध्दतीने घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जनसुनावणीचे प्रारुप इतिवृत्त (मराठी व इंग्रजी) मान्यतेसाठी सादर केले होते.

दिनाक 17/06/2020 रोजीचे पर्यावरण विषयक जनसुनावणीचे प्रारुप इतिवृत्त (मराठी व इंग्रजी) मा.अध्यक्ष, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया यांची मान्यता प्रदान करण्यात आली असुन सदर इतिवृत्त पुढील कार्यावाहीस यासोबत सादर करण्यात येत आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

(सचिन रा. वाढवे)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया

**प्रतिलिपी** :- मा.निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया.

(सचिन रा. वाढवे)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया

# गोंदिया जिल्ह्यातील २४ रेती घाटाची पर्यावरण विषयक लोकजनसुनावणीचे इतिवृत्त दि.१७/०६/२०२०.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी गोंदिया, ता. व जि. गोंदिया यांनी गोंदिया जिल्ह्यातील एकुण २४ रेतीघाट गोंदिया तालुक्यातील तेढवा (०.७० हेक्टर), डांगुर्ली (४.४६ हेक्टर), बनाथर (२.३५ हेक्टर), बिरसोला (३.८४ हेक्टर), मुरदाडा(पार्वती घाट ) (३.७७ हेक्टर), किन्ही (४.२० हेक्टर), देवरी (३.८५ हेक्टर), तालुका तिरोडा येथील कवलेवाडा (०.९६ हेक्टर), चांदोरी (बु.) (१.४४ हेक्टर), बिरोली (४.८३ हेक्टर), पिपरीया (१.८० हेक्टर), बोंडराणी (२.०४ हेक्टर), मांडवी (१.२० हेक्टर), घाटकुरोडा-१ (४.४० हेक्टर), घाटकुरोडा-२ (४.७० हेक्टर), तालुका सडक-अर्जुनी येथील कोहमारा (०.१६ हेक्टर), सावंगी-२ (०.४० हेक्टर), बाम्हणी (०.२० हेक्टर), तालुका आमगांव येथील घाटटेमनी(डोंगा घाट) (०.२८ हेक्टर), ननसरी (दुमोहन घाट) (१.६० हेक्टर), तालुका अर्जुनी-मोरगांव येथील महागांव(नकटी घाट) (०.११ हेक्टर), वडेगांव (बंध्या) (०.५६ हेक्टर), तालुका देवरी येथील चुंभली (०.४७ हेक्टर) व तालुका सालेकसा तालुका येथील दरबडा (०.१६ हेक्टर) प्रस्तावित रेतीघाटाची लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज प्राप्त झाले.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. E-22/2020 vide letter No. BO/JD/(WPC)/PH/B-460 दि. २६/०५/२०२० अन्वये सदरच्या लोकसुनावणी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे. **(सहपत्र-१)**

१) श्री.सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया - **अध्यक्ष**

२) श्री ए.एम.करे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर - **सदस्य**

३) श्री. आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा - **समन्वयक**

श्री. आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियत्रण मंडळ,भंडारा तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सरदच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष श्री.सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया व प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,नागपूर व गोंदिया जिल्हयातील ऑनलाईन पद्धतीने Zoom App द्वारे उपस्थित नागरिकाचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४/०९/२००६ व सुधारित दि. ०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

गोंदिया जिल्हयातील २४ वाळु घाटांमधुन वाळुचा उपसा करण्याकरीता प्रकल्प प्रर्वतक जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी दि. २९/०४/२०२० रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी कळविले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणुन घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदुषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

म.प्र.नि. मंडळाकडे प्राप्त लोकसुनावणी घेण्याबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, गोंदिया यांचा परवानगीने दि. १७/०६/२०२० रोजी गोंदिया जिल्हयातील वाळु घाटांबाबत पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आली होती. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि . १७/०५/२०२० रोजी दैनिक **'लोकमत'** व दैनिक **'द हितवाद'** या वृत्तपत्रात जाहिरात प्रकाशित केली होती. तसेच अधिसुचनेप्रमाणे वाळु घाटासंबंधीचे ठळक वैशिष्ट असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती मराठी व इंग्रजीत शासनाच्या खालील कार्यालयामध्ये इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
२. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ५ वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
३. जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.
४. जिल्हा खनिकर्म कार्यालय, गोंदिया.
५. जिल्हा परिषद, गोंदिया.
६. जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया.
७. जिल्ह्यातील संबंधीत उप-विभागीय अधिकारी यांचे कार्यालय.
८. जिल्ह्यातील संबंधीत तहसिलदार यांचे कार्यालय
९. संबंधीत ग्रामपंचायत कार्यालये
१०. तसेच मंडळाच्या www.mpcb.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी दुपारी १२.०० वाजता दि. १७/०६/२०२० रोजी झुम ॲपद्वारे अध्यक्षांच्या परवानगीने अध्यक्ष, लोकसुनावणीचे समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली. उपस्थित लोकांची यादी **सहपत्र-२** नुसार सोबत जोडली आहे.

लोकसुनावणीचे संयोजकांनी मा.अध्यक्ष, मा.सदस्य व गोंदिया जिल्ह्यातील उपस्थित नागरीकांचे व झुम ॲपद्वारे उपस्थित असलेले नागरीकांचे स्वागत केले. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकांच्या सल्लागार या प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणाविषयी संपुर्ण सादरीकरण करण्यास आमंत्रित केले. मे.ॲनाकॉन लॅब, नागपूर यांनी झुम ॲपद्वारे प्रकल्पाचे सादरीकरण जनतेपुढे मांडले.

उप मा. जिल्हाधिकारी, गोंदिया व अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे कळविले.

..३/-

सादरीकरणानंतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना ऑनलाईन पद्धती द्वारे या वाळु घाटांबाबत त्यांचे मत, टिका-टिपण्णी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे ईमेलद्वारे दोन लेखी निवेदन प्राप्त झाल्याबाबत कळविले. उपस्थितांनी नोंदविलेली मतं व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

१) श्री. प्रताप गोस्वामी, किसान मंच, नागपुर:-

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधार/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | सदर जनसुनावणी पथकात कोणत्या अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.<br>सदर जनसुनावणी झुमअॅपद्वारे घेण्यात येत असून यावर शासनाने बंदी घातलेली आहे. या जनसुनावणीमध्ये एकही प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त व्यक्ती उपस्थित नाही. त्यांच्याकडे झुमअॅप ची सुविधा नाही. तसेच ऑनलाईन पध्दतीने जनसुनावणी घेण्याची तरतुद नाही. ही जनसुनावणी स्थगित करण्यात यावी. या जनसुनावणीची कार्यकारी सारांश EMP मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध नाही. | श्री.आनंद काटोले, समन्वयक यांनी पर्यावरण विषयक लोकसुनावणी पथकाचे अध्यक्ष श्री.सुभाष चौधरी, निवासी जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया आणि श्री.अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, सदस्य म्हणुन उपस्थित असल्याचे कळविले. या लोकसुनावणीकरीता आवश्यक जाहिरात दैनिक लोकमत व दैनिक हितवाद या वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आली होती. सदर पर्यावरण विषयक लोकसुनावणी उपस्थित नागरीकांच्या हरकती, टिका, टिप्पणी, शंका व प्रश्न नोंदविण्याकरीता घेत असून सुनावणी दरम्यान कुठलाच निर्णय व संमती देणे अपेक्षित नाही. या सुनावणीचे इतिवृत्त शासनास पुढिल कार्यवाहीकरीता पाठविले जाणार असल्याचे कळविले. मा.अध्यक्षांनी लोकसुनावणी शासनाच्या निर्देशानुसार घेत असल्याचे कळविले. |

२) श्री. सुनंदा रेड्डी वूटकुरी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न |
|---|---|
| १. | सदर प्रकल्पाला माझे समर्थन आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित झाला पाहिजे. सदर प्रकल्पामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व स्थानिक नागरीकांना त्याचा फायदा होईल. |

३) श्री.अरविंद प्रमोद सोवनी, आपली नदी, आपली रेती.

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधार/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | गोंदिया व भंडारा जिल्हा एकमेकास जोडलेले आहेत. येथे मोठ्या प्रमाणात रेतीची तस्करी होते. ही बाब विदर्भातील रेती तस्करीची भयानक परिस्थिती आहे, असे सुचविले. मा.गृहमंत्री यांनी विदर्भातील ६ जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्या सोबत बैठक घेवून अवैधरित्या रेती तस्करीवर योग्य त्या उपाययोजना करण्यास सांगितले. प्रत्येक रेती घाटावर सिसिटिव्ही फुटेज लावावे. सीसीटिव्हीचे फुटेज मंडळाच्या व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावे. तिरोडा भागातील रेती चोरीचे प्रमाणे जास्त आहे. टोल फ्री नंबर उपलब्ध करावे. | खनिकर्म अधिकारी, गोंदिया यांनी कळविले की, अवैध रेती तस्करी रोखण्याकरीता टोल फ्री नंबर उपलब्ध करण्याविषयी वरिष्ठ स्तरावर चर्चा करण्यात येईल. रेती घाटाच्या लिलावाच्या वेळेस सीसीटिव्ही कॅमेरा बसविणे बंधनकारक करण्यात येईल. |

महिलेनी विचारलेले प्रश्न स्पष्ट नाही.

४) श्री.सुधीर पालीवाल, विदर्भ पर्यावरण कृती समिती, नागपूर.

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधार/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | माझे लेखी निवेदन नोंदविले आहे काय? झुम ॲपवर बंदी असतांना ऑनलाईन पध्दतीने झुम ॲपवर लोकसुनावणी घेणे नियमा विरुध्द आहे. प्रस्तावित रेती घाटाची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध नाही. तसेच डीएसआर ची माहिती उपलब्ध नाही. मंडळाच्या संकेतस्थळावर फक्त कार्यकारी सारांश उपलब्ध आहे, ज्यामध्ये अल्प माहिती उपलब्ध आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी संपुर्ण माहिती उपलब्ध करणे बंधनकारक आहे. गोंदिया जिल्हा बेसाल्ट दगडाने व्यापलेला आहे. या जिल्ह्यात उडणारी राख मोठ्या प्रमाणात उपलब्ध असुनही नदीच्या रेतीचे उत्खनन करण्याची आवश्यकता नाही. गोंदिया जिल्ह्यात जमिनीतील पाण्याची पातळी खालावलेली आहे, त्यामुळे रेतीचे उत्खनन करू नये. | श्री. आ.नि.काटोले, संयोजक यांनी कळविले की, दि.१७/०६/२०२० रोजीचे लेखी आक्षेप रेकॉर्डवर घेण्यात आलेले आहे व सहपत्र-३ नुसार सोबत जोडले आहे. या प्रस्तावित रेती घाटाची माहिती दैनिक हितवाद व दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये रितसर प्रकाशित करण्यात आलेली आहे, ज्यामध्ये नागरिकांकडुन प्रकल्पाविषयी आक्षेप, सूचना, टिका व टिप्पणी ई-मेलद्वारे मागविण्यात आले आहे. त्यानुसारच श्री.सुधीर पालीवाल यांचे लेखी आक्षेप प्राप्त झालेले आहे. प्रस्तावित प्रकल्पाचे कार्यकारी सारांश मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. खनिकर्म अधिकारी, गोंदिया यांनी कळविले की, डीएसआर अहवाल संकेतस्थळावा माहे एप्रिल - २०२० मध्ये उपलब्ध करण्यात आले आहे. प्रस्तावित रेतीघाट मधील वाळू हे हाताने विना यंत्रसामुग्रीने उत्खनन करण्यात येईल, त्यामुळे पर्यावरणाचा व जंगलातील पशु-पक्षी व वनस्पतीची हानी होणार नाही. मा.अध्यक्ष यांनी कळविले की, नागरीकांनी मांडलेले संपुर्ण अभिप्राय/प्रश्न/सूचना नोंदविलेले आहेत व सदर हरकती शासनास पुढील कार्यवाहीकरीता पाठविले जाणार आहे. |

श्री. आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,भंडारा यांनी सर्व सहभागी नागरिकांना आवाहन केले की अजुन कुणास आपले मत मांडावयाचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर कुणीही आपले म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

उप मा.जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या कळविले की, नागरीकांनी मांडलेल्या अभिप्राय व सूचना याची दखल घेण्यात येईल. त्यानंतर उपस्थित केलेल्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी करण्यात आली व गोंदिया जिल्ह्यातील २४ रेती घाटाबाबत झुमअॅपवर उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व उपस्थित केलेल्या मुद्दयांची तंतोतंत इतिवृत्तात नोंद घेण्यात आली, असे कळविले. जन सुनावणी समितीचे अध्यक्षांनी जनसुनावणीचा समारोप केला. समन्वयक श्री. आनंद काटोले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनिधी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्ष यांचे परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (आनंद काटोले)<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि.मंडळ, भंडारा व<br>समन्वयक, लोक सुनावणी समिती | (अशोक करे)<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि.मंडळ, नागपूर व<br>सदस्य, लोक सुनावणी समिती | (सुभाष चौधरी)<br>निवासी उपजिल्हाधिकारी, तथा<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी,<br>गोंदिया व अध्यक्ष, लोक सुनावणी समिती |

**MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING OF 24 SAND MINING IN GONDIA DISTRICT DATED 17/06/2020.**

As per Ministry of Environment and Forest, Govt. of India Notification dated 14.09.2006 and amended notification dated 1.12.2009, District Mining Office, Collector Office, Gondia have requested Maharashtra Pollution Control Board to conduct Environmental Public Hearing for 24 Sand Ghats in Gondia District at Gondia Taluka Tedhva (0.70 Ha.), Dangurli (4.46 Ha.), Banathar (2.35 Ha.), Birsola (3.84 Ha.), Murdada (Parvati Ghat) (3.77 Ha.), Kinhi (4.20 Ha.), Devri (3.85 Ha.), Tiroda Taluka Kawalewada (0.96 Ha.), Chandori(Bu.) (1.44 Ha.), Biroli (4.83 Ha.), Pipriya (1.80 Ha.), Bondrani (2.04 Ha.), Mandvi (1.20 Ha.), Ghatkuroda-1 (4.40 Ha.), Ghatkuroda-2 (4.70 Ha.), Sadak-Arjuni Taluka Kohmara (1.16 Ha.), Sawangi-2 (0.40 Ha.), Bhamani (0.20 Ha.), Amgaon Taluka Ghattemani (Donga Ghat) (0.28 Ha.), Nansari (1.60 Ha.), Arjuni-Morgaon Taluka Mahagaon (Nakti Ghat) (0.11 Ha.), Wadegaon (Bandhya) (0.56 Ha.), Deori Taluka Chumbhali (0.46 Ha.) and Salekasa Taluka Darbada (0.16 Ha.).

Hon'ble Member Secretary, MPCB, Mumbai has issued Office Order vide letter No. E-22/2020 vide letter No. BO/JD/(WPC)/PH/B-460 dtd. 26/05/2020 for panel formation as given below for the public hearing (**Annexure-I**).

1. **Shri. Subhash Chaudhary - Chairman**
   **Resident Deputy Collector & Additional District Magistrate, Gondia**
2. **Shri.A.M, Kare, Regional Officer, MPCB, Nagpur - Member**
3. **Shri.A.N. Katole, Sub-Regional Officer, MPCB, Bhandara - Convener**

Convener of public hearing Shri. Anand Katole, Sub-Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Bhandara welcomed the Chairman of public hearing panel, Regional Officer, M.P.C. Board, Nagpur who was attending the hearing through Zoom App, officers of Revenue Department and all citizens of Gondia District who were attending the public hearing through Zoom App. Then the public hearing was started with the permission of Hon'ble Chairman.

At the outset, Convener of Public Hearing explained that it is mandatory to obtain environmental clearance for certain type of projects according to the provisions of EIA Notification of Ministry of Environment, Forest & Climate Change, New Delhi dtd. 14/09/2006 and Amendment dtd. 01/12/2009 and environmental public hearing is mandatory before obtaining the environmental clearance.

Project Proponent, District Mining Officer, Gondia has submitted proposal on 29/04/2020 alongwith requisite fees for the environmental public hearing for proposed sand excavation activity of total 24 sand Ghats of Gondia District.

Convener of Public hearing further narrated that the main purpose of public hearing is to get acquainted with the citizen's views about the various aspects of project and the effects thereof. Also, to make people aware about the pollution control arrangements required in the project and the concerned rules, and to consider the views expressed during the public hearing.

Accordingly, project proponent had submitted an application to Maharashtra Pollution Control Board (MPCB) for conducting Public Hearing as per the provisions of EIA Notification-2006 and amended Notification dated 1st December, 2009. It was briefed that, said public hearing is being conducted through Zoom App, according to the provisions made in the letter by Environment Department, GOM dtd. 04/05/2020 and letter dtd. 27/04/2020 from Revenue & Forest Department, Mantralaya, Mumbai. In this connection, MPC Board decided to hold public hearing in respect of the said project on 17/06/2020 in consultation with District Collector, Gondia. Maharashtra Pollution Control Board has published public notices in Marathi newspaper namely "Lokmat" and English newspaper "The Hitavada" on dated 17/05/2020. The appeal was made to the concerned to submit objections, suggestions, complaints, comments, if any, in respect of the said project to concerned regulatory authorities.

Copy of draft EMP report along with executive summary in respect of the said project were made available in English/ Marathi in the following offices to apprise the public.

1. Joint Director (WPC), M.P.C. Board, Kalptaru Point, 3rd Floor, Sion- Matunga Scheme Road No.8, Opp. Sion Circle, Sion (East), Mumbai-22.
2. Regional Office, M.P.C. Board, 5th Floor, Udyog Bhawan, Civil Lines, Nagpur.
3. District Collector, Gondia.
4. District Mining Office, Gondia.
5. Zilla Parishad, Gondia.
6. District Industries Centre, Gondia.
7. Sub-Divisional Office of above mentioned Talukas.
8. Tahsil Office of above mentioned Talukas.
9. Related Grampanchayat Office.
10. Website of Maharashtra Pollution Control Board: www.mpcb.gov.in

The Public Hearing started at 12.00 hrs. on 17/06/2020 through Zoom app with the permission of the Chairman of the Public Hearing Panel. Attendance of the People present during the Public Hearing is attached as **Annexure-II.**

With the permission of Chairman of Public Hearing the Sub-Regional Officer, MPCB, Bhandara has started Public Hearing by welcoming the Chairman and Member of the public hearing panel, local citizens from the village and others present through online zoom app mode. Convener instructed consultant of project proponent to present detail presentation regarding proposed 24 nos. sand mining project. The consultant M/s.Anacon Laboratory, Nagpur has shown detail presentation through Zoom app.

Chairman of the Public Hearing Panel stated that, this Public Hearing is for recording the views/objects/suggestions of the participants. All the suggestions/comments will be communicated to the Environment Department. He also clarified that this panel is not here to take decision for accordance of any approval to the project. He then appealed the participants to express their views/comments/suggestions.

**FOLLOWING HAVE PARTICIPATED DURING THE DISCUSSIONS, QUESTIONS AND COMMENTS / MADE BY PROJECT PROPONENT/ MPCB GIVEN BY PROJECT PROPONENT/PROJECT CONSULTANT/PUBLIC HEARING COMMITTEE**

1) **Shri. Pratap Goswami , Kisan Manch, Nagpur:-**

| Sr. No. | Objection/Suggestion/ Question | Comments / made by Project Proponent/ MPCB |
|---|---|---|
| 1 | Enquired about formation of Public Hearing Panel. Zoom App is banned by Government why online hearing is conducted through Zoom App. Public Hearing shall not conducted online when there is no Public Participation. Zoom App connectivity is not available to the local level. The public hearing is going on is not conducted as per the Guidelines/EIA Notification. Online hearing shall be postponed and Public Hearing having physical participation/Presence shall be organized. EMP is not available on website. EMP copies shall be provided. | A.N.Katole, Convener of public hearing panel inform that, public hearing Panel is chaired by Shri.Subhash Chaudhary, RDC & ADM, Gondia. All the necessary advertisement regarding public hearing is published in the daily English Newspaper Hitavada and Marathi Newspaper Lokmat. The public hearing forum is for recording of your objections/suggestions/comments. This forum is not supposed to deliver any judgement or approval. The minutes of meeting with all recording will be submitted to the Environment Department for further consideration. Chairman of public hearing panel stated that, the public hearing is being carried out as per the instructions received from Govt. of Maharashtra. |

2) **Shri. Vootkuri Sunanda Reddy, Environmentalist, Hyderabad:-**

| Sr. No. | Suggestions |
|---|---|
| 1 | I support this project. We recommend for commissioning of the project. Employment will be generated due to this project. We hope that due to commissioning of the project more employment opportunities will be generated which will be helpful for local people. |

3) **Shri. Arvind Pramod Sovani, Aapli Nadi Aapli Reti:-**

| Sr. No. | Objection/Suggestion/ Question | Comments / made by Project Proponent/ MPCB |
|---|---|---|
| 1. | Illegal Sand Mining is going on from River Wainganga at the District Bhandara and Gondia. How district administration will control unsustainable sand Mining in the district.<br>As per guidelines CC TV has been installed at Sand Ghats What action taken against illegal Sand Mining especially at Tirora Area.<br>All CCTV telecast shall be displayed live on NIC connected to District Administration as well as MPCB Website. Dedicated Toll free helpline shall be introduced for illegal sand mining activity. | Suggestions of Helpline Numbers will be taken up with higher Authorities. Installation of CCTV at Sand Ghats will be made compulsory while granting of sand mine through auction by District administration. |

**Ladies Participant: Not audible.**

4) **Shri. Sudhir Paliwal, Vidarbha Environment Action Group, Nagpur:-**

| Sr. No. | Objection/Suggestion/ Question | Comments / made by Project Proponent/ MPCB |
|---|---|---|
| 1 | Whether my written objection is on record? Online meeting shall not be conducted through Zoom App. In spite of guideline regarding not to use Zoom App, why this hearing was conducted on Zoom App.<br>Information related to proposed sand mining is not available at Project Proponent as well as MPCB web site. EMP/DSR is not available at any forum.DSR Not available at Project Proponent Web site. | Shri. A.N. Katole, Convener of public hearing panel inform that, the written objections received from Mr.Sudhir Paliwal dtd.17/06/2020 is on record. **(Annexure-III)**<br><br>Wide publicity was given for this Public Hearing. Notices published in the English and Marathi Newspaper with a request to submit any objection/suggestions/remarks through email. Accordingly this office has received Written objection from Mr Sudhir Paliwal. |

| | | |
|---|---|---|
| | Only Executive Summery is available on MPCB Website and that is without details. Consultant of Project Proponent shall include each and every detail in EMP/Executive summery.<br>Gondia district is full of Basalt Rocks. Fly ash is valuable in Gondia district then why River sand need to be mined. When the ground water table is depleted in this areas then River sand mining should be avoided. | Executive summery is displayed on MPCB Web site. Notice is publish in Newspaper giving all the details of Proposed sand mine locations. Draft DSR Report put up on Web site in the Month of April2020.The proposed sand Ghats.<br>Mining Officer, Gondia submitted that, Draft DSR Report put up on Web site in the Month of April2020.The proposed sand mining will be done manually and there will be no adverse effect on flora and fauna.<br>Additional District Magistrate & Chairman has informed that, All the suggestion/remarks/Objection are noted with video recording and it will submitted to Environment department for consideration. |

Convener of the public hearing panel appealed to the participants if there any more questions. No further questions/remarks received from participants.

Shri. Subhash Chaudhary, **Chairman of Public Hearing Panel** has informed to public that all views and comments are noted and recorded. The proceeding will be submitted to the Environment Ministry for further consideration. Finally, Chairperson of the Public Hearing Panel has summarized the proceeding of public hearing in detail and **Shri.Anand Katole, SRO, MPCB** thanks all the officials, public and local villagers present in the public hearing. The public hearing is concluded with the vote of thanks to the chair.

(Anand Katole)
**Sub-Regional Officer, MPC Board, Bhandara & Convener of the Public Hearing Panel**

(Ashok Kare)
**Regional Officer, MPC Board, Nagpur & Member of the Public Hearing Panel**

(Subhash Chaudhary)
**Resident Deputy Collector, Gondia and Chairman of the Public Hearing Panel**